अपील अधिकारी तथा सामान्य प्रशासन विभाग
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org
अपील क्र.७२/२०२३

जा.क्र उआ (सा.प्र.)/ आस्था/६३५४ दि. २१ /०९/२०२३

**अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त , सामान्य प्रशासन विभाग, पुणे महानगरपालिका**

अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/७२/२०२३

प्रति,

श्री.शेख निसार अहमद मोहम्मद ईस्माईल

स.नं.७०, गल्ली नं.०२, संतोषनगर

कात्रज, पुणे-४११०४६

यांस

---------------- अपिलार्थी

विरुद्ध

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी**
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

**श्री.शेख निसार अहमद मोहम्मद ईस्माईल**, स.नं.७०, गल्ली नं.०२, संतोषनगर , कात्रज, पुणे-४११०४६ (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी आ.क्र.५८४२, दि.०५/०७/२०२३ अन्वये माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्ज प्राप्त झाला आहे.

अपिलार्थी यांचे मूळ अर्जातील माहिती बाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा.क्र.जमाअ/आस्था/४८५९, दि.०२/०८/२०२३ अन्वये अर्जास माहिती दिलेली आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| ०५/०७/२०२३ | ०५/७/२०२३ | ४/८/२०२३ | ०२/८/२०२३ | ० |

अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती अर्धवट व अपूर्ण असल्याने अपिल सुनावणी घेणेकामी दि.२९/०८/२०२३ रोजी (आ.क्र.९०८० दि.२९/८/२०२३) रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| २८/८/२०२३ | २९/८/२०२३ | १/९/२०२३ | होय | -- |

अपिल दिनांक ०८/०९/२०२३ रोजी सकाळी ११.३० वा. सुनावणी आयोजित करण्यात आली होती. अपिलार्थी यांना दूरध्वनीवरुन सुनावणीस उपस्थित राहणेबाबत दि.०७/९/२०२३ रोजी दुपारी ४.०० वा.कळविण्यात आले होते. सुनावणीस अपिलार्थी उपस्थित होते व जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी ,आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका हे अनुपस्थित होते.

## विवेचन

अपिलार्थी यांनी "अर्धवट व अपूर्ण माहिती मिळाली असल्याचे", अपिल अर्जात नमूद केले आहे.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग पुणे महानगरपालिका यांनी अर्जास जा.क्र.जमाअ/आस्था/४८५९, दि.०२/८/२०२३ रोजीचे पत्रान्वये दिलेले उत्तर व अपिलार्थी यांचे लेखी म्हणणे पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | मागितलेली माहिती | उपलब्ध माहिती |
|---|---|---|
| १ | मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र ठ.क्र.०१/३१७ जा.क्र.मआ/उआ/से/८९१, दि.२८/६/२००१ नुसार पाच ऊर्दु माध्यम शिक्षण सेवक पदी नियुक्ती समितीमार्फत शिक्षकांची निवड करण्यात आलेली आहे. त्या समितीने लेखी/मुलाखत घेवून जे गुणदान केलेले आहे ते गुणदान तक्त्यांची साक्षांकित प्रत कृपया देण्यात यावी ही विनंती. | प्रस्तुत प्रकरणी विचारणेत आलेली माहिती ही खूप जुनी असलेने सदरची माहिती उपलब्ध करुन देणेस काही कालावधी लागणार असून सध्या माहिती शोधण्याचे काम सुरु आहे. तसेच सदरची माहिती प्राप्त होताच आपणास त्याबाबत कळविणेत येईल. |

माहिती अधिकार अर्जात मागितलेली माहिती कोणशी निगडीत आहे असे अपिलीय अधिकारी यांनी प्रश्न उपस्थित केला. सदर बाब माझी पत्नी श्रीमती रुबीना शेख यांचेशी निगडीत आहे. संबंधित अपिलर्थी यांना गुणांकन तक्ता देणे शक्य आहे. जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा शोध घ्यावा. माहितीच्या उपलब्धतेबाबत १० दिवसात स्पष्ट कळवावे. सदर विवेचनाअंती पुढील प्रमाणे आदेश पारित करणेत येत आहे.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी माहितीचा दहा दिवसात शोध घ्यावा व त्याबाबत अपिलार्थी यांना विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. त्यानुसार, सदर अपिल क्र.७२/२०२३ निकाली काढण्यात येत आहे.

11/9/23

(सचिन इथापे)
अपिलीय प्राधिकारी तथा
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका

---

सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे-१ यांचेकडे व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतुद आहे.

सदर निकालाची प्रत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**प्रत/-**

जन माहिती अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका.